# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
## उद्यान विभाग कार्यालय, सोलापूर
ई.मेल— smcgardensp@gmail.com, फोन नं.०२१७-२७४०३९४


आझादी का अमृत महोत्सव

जा.क्र./उ.प्र./3-ब/ दि.१३/१२/२०२३

## ऑफलाईन लिलाव प्रक्रिया जाहिर प्रसिध्दीकरण (द्वितीय)

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील हैद्राबाद रोड येथील जकात नाका जागेवर पेट्रोल पंप उभारणे कामी सदर जागेवरील वृक्ष काढणे कामी दि.०२/०५/२०२३ रोजीच्या वृक्ष प्राधिकरण समिती सो.म.पा. यांचे बैठकीत मंजूरी देणेत आली आहे. सदर जागेवर निविदा-दिलेल्या तारखेपासून १५ दिवसात सदरवृक्ष काढून जागा रिकामी करुन देणे कामी ऑफलाईन लिलाव प्रक्रिया पध्दतीने करणे कामी सोलापूर महानगरपालिकेच्या http:/solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर दि. 14 / 12 /२०२३ पासून पहाणेस उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | एकूण क्षेत्रफळ | झाडांची संख्या | एकूण किंमत (किमान) | प्रवेश फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जकात नाका हैद्राबाद रोड, सो.म.न.पा. | एकूण २००चौ.फुट | एकूण १४५ | ८५५२०/- | १०००/- |

सदर ऑफलाईन लिलाव प्रक्रिया ही जकात नाका हैद्राबाद रोड सो.म.पा.या लिलाव ठिकाणी दि. 22/12/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता घेण्यात येईल.

उद्यान अधिक्षक तथा,
सहा. वृक्ष अधिकारी
सोलापूर महानगरपालिका

'2023

# ऑफलाईन लिलाव संबधीच्या सूचना (अटी व शर्ती)

अ) लिलाव फी व इसारा रक्कम (EMD)

१. सदर संपूर्ण लिलाव ऑफलाईन पध्दतीने होईल. सदर लिलाव नोटीस प्रसिध्दी सुचना इत्यादीची माहिती http/solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

२. ऑफलाईन लिलाव फी (Auction Fee) र.रु. १०००/- भरणा सोलापूर महानगरपालिकेचा कोषागारात भरण्यात यावा व त्याची पावती इकडील कार्यालयास लिलावाचा वेळी उपलब्ध करून देण्यात यावी. सदर फी ना परतावा प्रकारची असुन कोणत्याही प्रकारे वापस मिळणार नाही.

३. ऑफलाईन लिलाव करिता र.रु.५०००/- इतकी रक्कम इसारा स्वरुपात सोलापूर महानगरपालिकेचा कोषागारात भरण्यात यावा व त्याची पावती इकडील कार्यालयास लिलावाचा वेळी उपलब्ध करून देण्यात यावी.

४. सदर Auction Fee व इसारा रक्कम भरलेल्या इछुकांनाच सदर ऑफलाईन लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेता येईल.

५. सदर लिलावातील सहभागी अभिकार्त्यानी लिलावाची बोली ही र.रु.५०००/- चे पटीमध्ये बोलणे आवश्यक आहे.

६. लिलाव रद्द करणेचे संपुर्ण अधिकार हे उपायुक्त तथा वृक्षअधिकारी यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहेत.

७. लिलाव ज्याअभिकर्त्यास मंजुर झाला असेल त्याचेकडुन भरण्यात येणाऱ्या बोली रकमेमध्ये भरलेली रक्कम विनियोजीत करण्यात येईल किंवा अभिकर्त्याने नमूद केलेली बोली रक्कम पुर्णपणे जमा केल्यास पात्र अभिकर्त्यांची इसारा रक्कम परत करण्यात येईल.

ब ( सदर लिलाव सादर करणे) - लिलावात खालील प्रमाणे नमुद बोलीची कागदपत्रे सादर करावी.

१. विहित लिलाव ऑफलाईन पध्दतीने सादर करणे आहे.

२. खालील नमूद तांत्रिक बोलीची कागदपत्रे प्रत्यक्ष लिलावाच्या ठिकाणी लिलाव सुरु करणेपुर्वी सादर करावयाची आहेत.

३. आपला पत्ता व ओळख पटविण्याकरीता आवश्यक कागदपत्रे उदा. डायव्हींग लायसेन्स, निवडणुक ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड अथवा शासकिय संस्थेने दिलेले ओळखपत्र यांची छायांकित प्रत.

i) निविदा फी व इसारा फी भरणा केल्याची प्रत.

ii) GSTप्रमाणत्राची प्रत जोडणे आवश्यक राहील.

iv) मागील आर्थिक वर्षाचा आयकर भरणा विविरणपत्र व पॅनकार्ड छायांकित प्रत ).

लिलावाची वित्तीय बोली ऑफलाईन लावणेची आहे

१. वरील विहित केलेली आवश्यक ती सर्व कागदपत्रे ऑफलाईन सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा लिलावाची बोली अपात्र ठरुन वित्तीय बोली रद्द करण्यात येईल.

२. केवळ विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लिलावाची बोली स्वीकारण्यात येतील. कोणत्याही विलंब झालेल्या लिलावा बोली स्वीकारण्यात येणार नाही सबब इच्छुकांनी प्रत्यक्ष अंतीम मुदतीत प्रतीक्षा न करता लिलाव बोली विहीत वेळेत लावाव्यात.

क) लिलाव स्वीकारणे/ फेटळणे

023

१. ऑफलाईन लिलाव करीता इसारा रक्कम (EMD) न भरल्यास तसेच वरील कागदपत्रापैकी कोणतेही एक कागदपत्र सादर न केल्यास, सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रात खरेपणा न आढळल्यास, लिलाव सादर करतांना भ्रष्ट व कपटी मार्गाने अवलंब केलेचे निदर्शनास आल्यास, सशर्त लिलाव सादर केल्यास हे कार्यालय बोली धारकास निवड कामी ठरविलेल्या पात्रता पुर्ण करु न शकल्यास मबंधीताची बोली फेटाळण्यात येईल.

२. सर्वसाधारपणे व शक्यतो जादा दराची लिलाव बोली निविदेच्या मान्यते करिता स्वीकारण्यात येईल किंवा कारणे नमुद करुन अथवा काही कारणास्तव दुसऱ्या उत्तम दराची लिलाव मंजुर करण्याचा अधिकार विभागास राहील.

३. ऑफलाईन लिलाव कामाच्या अटी शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार काही बदल करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

४. कोणतेही कारण नमुद करुन अथवा असे कारण न देता सदर लिलाव फेटालण्याचा अधिकार विभागाने राखून ठेवलेला आहे.

५. कंत्राटदाराच्या एक अथवा सर्व लिलाव कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार स्वाक्षरीकर्ता यांनी राखुन ठेवलेले आहेत.

ड (इतर अटी)

१. विक्री करण्यात येत असलेल्या झाडांची पाहणी मोक्यावर खरेदीदारांनी लिलावत सहभागी होण्यापुर्वी स्वतःची खात्री करुन घ्यावी. सद्यस्थितीतील झाडांची संख्या कमी/जास्त झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी अभिकर्त्याची राहील.

२. आर्थिक लिफाफा क्रं.२ मध्ये संपुर्ण उभ्या झाडाच्या कीमतीच्या देकार महत्तम ठोक रक्कमेचा (लमसम) स्वरुपात नमुद करण्यात यावा.

३. जास्तीत जास्त देकार भरणा-या कंत्राटादारास झाडे विकण्यात येतील व त्यांस रु १०० च्या मुद्रांक दस्ताऐवजावर उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी, सोमपा यांच्याशी करारनामा करुन घ्यावा लागेल.

४. महत्तम देकार धारकास त्यांची देकार मंजुर करण्यात आल्याचे कळविण्यात आल्याच्या दिनांकापासुन ७ दिवसाच्या आत स्विकारलेल्या प्रस्तावांची संपुर्ण रक्कम वृक्ष अधिकारी, सोमपा यांचे नावे काढलेल्या धनाकर्षव्दारे भरावी लागेल तसेच सदर काम वाटप केल्यांनतर सदर कामाशी निगडीत कर बोली धारकास स्वतंत्र पणे भरावे लागतील अन्यथा महत्तम देकार रद्द करण्यात येईल व वरील झाडावर त्यांचा हक्क राहणार नाही. हा ७ दिवसाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवुन दिला जाणार नाही.

५. ज्या जागेवरील झाडांचा लिलावात समावेश करण्यात आलां आहे. त्या झांडाचे सिमांकन भुमी व मालमत्ता विभागाकडुन करुन देण्यात येईल. त्या सिमेच्याबाहेरील झाडे तोडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी झाडे विकत घेण्या-यांची राहिल. तसे केल्यास त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र (नागरी) झाडे जोपासना कायदा १९७५ अंतर्गत कायदेशीर कारवाई करणेत येईल.

६. सिमांकण झालेल्या जागेवरील जमिनीखालील १ मीटर पर्यन्त झाडे विकण्यात येतील सिमांकरणसाठी लागणा-या सर्व सामुग्रीचा पुरवठा हे लिलाव स्विकारणा-या कंत्राटदारास त्याचे स्वखर्चाने करावे लागेल.

७. विकण्यात आलेली झाडे व पालापाचोळा सिमेबाहेर घेवून जाण्याकरीता संबंधीत वन खात्याची व राजस्व खात्याची रितसर परवानगी कंत्राटधारकांस स्वखर्चाने स्वतः प्राप्त करुन घ्यावी लागेल. यासाठी वेगळा कालावधी ग्राह्य धरता येणार नाही.

८. बोलीदार वस्तु व सेवा कर अधिनियमानुसार बोलीच्या पुर्ण रक्कमेवर १८% वस्तु व सेवा कर बोलीच्या रकमांचे व्यतिरीक्त भरावे लागेल.

९. झाडे कटाई जागेवरील साफसफाई करुन देणे ही अभिकरणाची जबाबदारी राहिल. धनाकर्षाच्या स्वरुपात कार्यरंभ आदेशापुर्वी भरावी लागेल. सर्व झाडांची कापणी प्रक्रीया कार्यरंभ आदेशापासुन १५ दिवसाच्या आत पर्यन्त पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यांनतर पुढील १० दिवसाच्या आंत संपुर्ण क्षेत्रातील व जमिनीवरील झाडोरा / पालापाचोळा पुर्णपणे स्वच्छ करुन सिमांकण क्षेत्राच्या बाहेर काढणे आवश्यक आहे. विहीत मुदतीत संपुर्ण क्षेत्रातील व जमीनीवरील झाडोरा स्वच्छ न केल्यास रु ५०००/- प्रतिदिन प्रमाणे दंडाची आकारण्यात येईल. दंडाची रक्कम कापुन उर्वरीत अनामत रक्कम परत करण्यात येईल. अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.

१०. सदर काम हे १५दिवसाचा कालावधीत पुर्ण करुन देणे बंधनकारक राहील.

११. या कामी भरणा केलेले अधिमुल्य हे ना-परतावा (Non Refundable) तत्वावर असुन कोणत्याही प्रकारच्या व्याजाची रक्कम देय होणार नाही. तसेच जास्तीस जास्त अधिमुल्य नमुद करणा-या व्यक्तीस सदर काम देण्याची कार्यवाही करण्यात येईल. प्रथम उच्चतम बोलीधारकाने कामाचे आदेश दिल्यांनतर ८ दिवसात प्रत्यक्षात काम सुरु न केल्यास दुस-या उच्चतम बोलीधारकास काम देण्याबाबत विचार करण्यात येईल.

१२. ऑफलाईन लिलावा मध्ये नमुदकेल्या प्रमाणे संबंधीत कामाची ठरवुन देण्यात आलेली रक्कम जास्त बोली धारकांस त्वरीत व एक रक्कमी भरावी लागेल. तसेच सदर काम वाटप केल्यानंतर सदर कामाशी निगडीत असेलेले सर्व कर बोली धारकास स्वतंत्रपणे भरावे लागतील.

१३. विक्री झालेल्या जागेवरील झांडाची कटाई, ढलाई व साफसफाई इत्यादीला लागणारा खर्च अभिकर्त्यास स्वतः करावा लागेल.

१४. सिमांकण केलेले जागेवरील झाडे झुडपे व फांद्या जमीनीपर्यंत कापण्यासाठी आवश्यक तो मजुर पुरवठा इत्यादी उपलब्ध झाल्यानंतर संबंधीत कार्यालयाकडुन प्रतिनीधी क्षेत्रीय सिमांकण करीता उपलब्ध करण्यात येईल.

१५. सदर कापणी करावयाच्या संबंधीत या क्षेत्रात लागु असणा-या सर्व प्रकल्पाच्या कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी दरपत्रक भरणा-याची राहील. याची नोंद घेऊनच दरपत्रक भरावे.

१६. . रस्त्याच्याकडेला असलेल्या उभ्या झाडांची कापणी केलेल्या कामाचे प्रमाणपत्र काम पुर्णत्वानंतर सादर करणे आवश्यक राहील.

१७. अटि व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार सक्षम प्रधिका-याने राखून ठेवला आहे.

१८. वरील कामाबात चौकशी करायची असल्यास उद्यान विभाग,सोमपा या कार्यालयास संपर्क करावा.

Signed by
आयुक्त
Sheetal Basavaraj Teli Ugale
तथा वृक्ष प्राधिकरण अधिकारी
Date: 29-08-2023 19:50:58
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर